# कलम ४ (१) (ब) (iii)

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदाईत्व निश्चित करून कार्यपध्दतीचे प्रकाशन
(कामाचा प्रकार / नाव)

कामाचे स्वरूप :- म.न. पा वाहनांचे देखभाल व दुरुस्ती करणे व वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणे
संबंधीत तरतूद :-महाराष्ट्र महापालिका अधिनियम
अधिनियमाचे नाव :- म.न.पा वाहनांची दुरुस्ती करणे
नियम
शासन निर्णय :-mmc act ,PWD Act शासन निर्णय परिपत्रके कार्यालयीन आदेश
परिपत्रके
कार्यालयीन आदेश

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कालवधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | मनपा वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणे | निविदेमधील नमुद कालावधी | विभाग प्रमुख<br>कार्यकारी अभियंता<br>कार्यव्यवस्थापक<br>सहा कार्यव्यवस्थापक<br>कनिष्ट अभियंता<br>लेखाधिकारी<br>संबधित लिपिक | |
| २ | वाहनांची दुरुस्ती करणे | कामानुसार कामकाज आदेश नमुद केलेनुसार | कार्यकारी अभियंता<br>कार्यव्यवस्थापक<br>कनिष्ट अभियंता<br>सहा कार्यव्यवस्थापक<br>लेखाधिकारी<br>संबधित लिपिक | |
| ३ | वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणे | मनपास आवश्यकते अनुसार | कार्यकारी अभियंता<br>कार्यव्यवस्थापक<br>कनिष्ट अभियंता<br>संबधित लिपिक | |
| ४ | बाह्ययंत्रणेकडून वाहन चालक कर्मचारी पुरवणे. | मनपास आवश्यकते अनुसार | कार्यकारी अभियंता<br>कार्यव्यवस्थापक<br>कनिष्ट अभियंता<br>संबधित लिपिक | |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## यांत्रिकी विभाग

<u>यांत्रिकी विभागाकडून करणेत येणा-या कामकाजाचा तपशिलः-</u>

१). वाहन दुरूस्ती-

म.न.पा. च्या वापरात असलेल्या सर्व प्रकारच्या वाहनांची दुरूस्ती कार्यशाळेमार्फत करण्यात येते. वाहनांच्या किरकोळ स्वरपाची दुरूस्ती व वाहनांचे वॉशिंग ग्रिसिंग कार्यशाळेतील तांत्रिक कर्मचा-यांकडून करून घेण्यात येते. वाहनांचे मेजर स्वरपाचे दूर्सीत कामे गटवार पध्दतीने निविदा मागवून ठेकेदार निश्चित करून त्यांच्याकडून करून घेण्यात येतात.

म.न.पा. च्या वापरात असलेल्या वाहनांचे एकूण पाच गट करणेत आलेले आहेत ते खालील प्रमाणे

१) अ गट - अँबेसिडर, मारुती एसटीम, ओमनी , टाटा इंडिका, इंडिगो, महिंद्रा लोगान, जीप
२) ब गट - टाटा सुमो(सर्व प्रकारची वाहने) ,मोबाईल , टेम्पो ट्रॅव्हलर, विंगर, जेसिबी
३) क गट(१)-टाटा ४०७,६०८,७०९,७१२,ट्रॅक्टर ट्रॉली , फिरते शौचालय
क गट(२)-टाटा ए.सी.ई, डिसिल्टिंग, हाई प्रेशर जेटिंग, डिटॅज व्हेईकल
४) ड गट - HGV , स्वराज मझदा, वॉटर टँकर अग्निशमक वाहने ,
लोड बॉडी हायड्रॉलिक लॅडर या सर्व वाहनांचे मेकॅनिकल स्वरुपाचे काम
५) ई गट - हायड्रॉलिक यंत्रणेचे कामकाज- हायड्रॉलिक लॅडर, टिप्पर, कारकस
वाहने, गुरे वाहक, बिफ वाहने, ट्री कटींग

वरील प्रमाणे गट तयार करणेत आले असून त्यांचे दुरूस्तीकामी गटवार पध्दतीने निविदा मागविणेत येतात. प्राप्त झालेल्या निविदांचे अवलोकन करून लघुत्तम दराच्या निविदाधारकांकडून ज्या त्या गटातील वाहनांची दुरूस्तीकामे करून घेणेस मा. स्थायी समितीची मान्यता घेणेत येते. मा. स्थायी समितीच्या मान्यतेने प्रत्येक गटासाठी दुरूस्ती एजन्सीज निश्चित करण्यात येतात. निश्चित केलेल्या ठेकेदाराकडून ठराविक कालावधीकरीता करारनामे करून घेण्यात येतात. तदनंतर त्यांना कामाचा आदेश निर्गत करण्यात येतात.

अ) वाहन दुरूस्तीकामी कार्यशाळेत आले नंतर सर्वप्रथम सदर वाहनाची नोंद सुरक्षा गेटवर घेण्यात येते. त्याचवेळी वाहनाच्या किलोमीटरची नोंद सुध्दा घेणेत येते. तदनंतर सदरचे वाहन कार्यशाळेच्या तांत्रिक कर्मचा-यांच्या ताब्यात देण्यात येते. तांत्रिक कर्मचारी वाहनचालकाच्या अर्जानुसार सदर वाहनाची तपासणी करून जॉबकार्ड तयार करतात. दुरूस्तीचे काम किरकोळ स्वरूपाचे असलेस कार्यशाळेकडील कर्मचा-यांकडून करून घेण्यात येते. मेजर स्वरूपाची दुरूस्ती असल्यास ज्या त्या गटासाठी निश्चित केलेल्या ठेकेदारांना कामाचे आदेश देणेत येतात. दुरूस्ती कामाच्या स्वरूपानुसार त्यांना कामाचा कालावधी देणेत येतो.

ब) ठेकेदारानी वाहनाची दुरूस्ती करून दिले नंतर त्यानी वाहनासोबत सादर केलेल्या चलनानुसार सदर वाहनाची तपासणी तांत्रिक कर्मचा-यांव्दारे करण्यात येते. सदर वाहनाची ट्रायल घेवून वाहन ताब्यात घेणेत येते. वाहन व्यवस्थित दुरूस्त झाल्याची खात्री करून सदरचे वाहन वाहन चालकाच्या ताब्यात देणेत येते.

क) वाहन दुरूस्तीनंतर ठेकेदारांनी सादर केलेल्या बिलांची तांत्रिक तपासणी करून बिल अदायगीची कार्यवाही करणेत येते. बिल अदा करतेवेळी मंजरू निविदा दराचे व निविदेतील व करारनाम्यातील अटी/शर्तीचे तंतोतंत पालन करून ठेकेदारास बिलाची अदायगी करणेत येते.

२) वाहन खरेदी –

मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. प्रशा/१५/कावि/२८९/९९ दिनांक २६/०६/१९९९ अन्वये फक्त तांत्रिक स्वरूपाची वाहने कार्यशाळेकडून खरेदी करणेत येतात. प्रशासकीय वाहने आवश्यकतेनुसार संबंधीत विभागामार्फत खरेदी करण्यात येतात.

तांत्रिक वाहने खरेदी करतेवेळी सदर वाहनासाठी आवश्यक असणा-या चासिज शासकीय दराने चासिज उत्पादीत कंपनीकडून खरेदी करणेत येतात. सदर चासिजवर बॉडी बिल्डींगचे काम करणेकामी निविदा मागविणेत येतात. प्राप्त झालेल्या निविदांचे अवलोकन करून लघुत्तम दराचे निविदाधारकाची एजन्सी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात येते. त्यानंतर सदर वाहनांच्या बॉडी बिल्डींगचे काम करून घेण्यात येते.

वाहनांचे बॉडी बिल्डींग झाले नंतर त्यासोबत सादर केलेल्या चलनानुसार सदर वाहनाची तपासणी करून मंजूर स्पेसिफिकेशन प्रमाणे बॉडी बिल्डींगचे काम समाधानकारक झाले असलेस सदर बॉडी बिल्डींगचे बिल संबंधीत ठेकेदारास अदा करणेत येते. सदर वाहनामध्ये हमी कालावधीमध्ये काही अडचणी निर्माण झालेस संबंधीत ठेकेदाराकडून त्या निरस्त करून घेणेत येतात.

३) स्थायी अग्रिमधन –

म.न.पा. च्या वापरात असलेल्या वाहनाच्या किरकोल स्वरूपांच्या दुरूस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअरपार्टस स्थायी अग्रिमधनातून खरेदी केले जातात.तदनंतर सदर बिलांची लेखाशाखेकडून प्रतिपूर्ती करून घेणेत येते.

४) माहिती अधिकार –

केंद्र शासन माहितीचा अधिकार २००५ नुसार कार्यशाळा विभागाशी संबंधीत मागविणेत आलेली माहिती संकलीत करून उपलब्ध असलेली माहीती अर्जदारास देणेत येते.

५) जे. सी. बी. –

म.न.पा. कडील जे.सी.बी. या प्रकारच्या वाहनाची दुरूस्ती करणेकामी खालील प्रमाणे कार्यवाही करणेत येते.

प्रथम वाहने किती आहेत याची सविस्तर माहिती घेऊन त्याप्रमाणे निविदा रक्कम ठरविली जाते. त्यास प्रशासकीय मान्यता घेऊन जनतासंपर्क विभागाकडून रोटेशन घेऊन निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द केली जाते. आलेले निविदा फॉर्म हे मध्यवर्ती भांडार विभागामध्ये टेंडर कमीटीव्दारे सदरच्या निविदा उघडणेत येतात. आलेल्या निविदामधून जे सर्वात कमी दराचे निविदाधारक असतील त्यांच्या समवेत करारनामा करणेकामी मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन मा. स्थायी समितीकडे विषयपत्र सादर करणेत येते. व मा. स्थायी समितीने विषय मंजूर केलेनंतर निविदाधारकाशी करारनामा करून त्यांना कामाचा आदेश देण्यात येतो. व वाहन मनपा कार्यशाळेत आले नंतर संबंधीत वाहनाचा दुरूस्ती अर्ज घेऊन वाहनाची तपासणी करून फिटर जॉबकार्ड बनवतात त्यानुसार संबंधीत ठेकेदारास कामाचा आदेश देणेत येतो. व त्या वाहनाची दुरूस्ती नंतर ठेकेदाराने दिलेल्या बिलाची नोंद हिस्ट्रिशिटला घेऊन बिले एकत्रित करून मा. कार्यकारी अभियंता (वि/काशा) यांची स्वाक्षरीने लेखा विभागाकडे अदा करणेकामी पाठविली जातात या प्रमाणे कार्यवाही करणेत येते.

६) म.न.पा. कडील वाहनांना जादा सुविधा बसविणेबाबत. –

म.न.पा. च्या पदाधिकारी व अधिकारी यांचे वापरात असलेल्या वाहनांना जादा सुविधा बसविणेत येतात. सदरच्या सुविधा ह्या त्याचे कामाचे अंदाजपत्रक बनविणेत येऊन त्याचा खर्च किती होईल याची खातरजमा करणएत येते. व त्यास मा. आयुक्त / मा. कार्यकारी अभियंता (वि/काशा) यांची मान्यता मिळालेनंतर संबंधीत ठेकेदारास कामे करण्याचा आदेश देण्यात येतो. त्यानंतर बिल अदायगीची कार्यवाही करणेत येते.

७) फिरते शौचालय –

प्रथम वाहने किती आहेत याची सविस्तर माहिती घेऊन त्याप्रमाणे निविदा रक्कम ठरविली जाते. त्यास प्रशासकीय मान्यता घेऊन जनतासंपर्क विभागाकडून रोटेशन घेऊन निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द केली जाते. आलेले निविदा फॉर्म हे मध्यवर्ती भांडार विभागामध्ये टेंडर कमीटीव्दारे सदरच्या निविदा उघडणेत येतात. आलेल्या निविदामधून जे सर्वात कमी दराचे निविदाधारक असतील त्यांच्या समवेत करारनामा करणेकामी मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन मा. स्थायी समितीकडे विषयपत्र सादर करणेत येते. व मा. स्थायी समितीने विषय मंजूर केलेनंतर निविदाधारकाशी करारनामा करून त्यांना कामाचा आदेश देण्यात येतो. व वाहन मनपा कार्यशाळेत आले नंतर संबंधीत वाहनाचा दुरूस्ती अर्ज घेऊन वाहनाची तपासणी करून फिटर जॉबकार्ड बनवतात त्यानुसार संबंधीत ठेकेदारास कामाचा आदेश देणेत येतो. व त्या वाहनाची दुरूस्ती नंतर ठेकेदाराने दिलेल्या बिलाची नोंद हिस्ट्रिशिटला घेऊन बिले एकत्रित करून मा. कार्यकारी अभियंता (वि/काशा) यांची स्वाक्षरीने लेखा विभागाकडे अदा करणेकामी पाठविली जातात या प्रमाणे कार्यवाही करणेत येते.

८) मा. पदाधिकारी व अति उच्च अधिकारी यांचे वाहनाबाबत –

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे उच्चपदस्थ पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजत अडथळे निर्माण होऊ नये म्हणून लान्सर व भविष्यात खरेदी करणेत येणारी वाहने हे त्या त्या उत्पादीत कंपनीचे अधिकृत विक्रेते / दुरूस्तीधारक यांचेकडून त्यांचे दरात करारनामा न करता निविदा न मागविता दुरूस्त करून घेण्यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.५७६ दिनांक ०४/०६/२००२ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार ज्या त्या वाहनांच्या उत्पादीत कंपनीच्या अधिकृत डिलरकडून वाहने दुरूस्त करून घेणेत येत आहेत. व त्या प्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

९) वाहन वाटपाबाबत –

आदेश क्र. जस/५/कावि/२३९/१२ दिनांक २०/०९/२०१२ अन्वये मनपाच्या वापरातील वाहनांचे वाटपाचे कामकाज कार्यशाळा विभागाकडे देणेत आलेले आहे. त्यानुसार विभागाच्या मागणी/आवश्यकतेनुसार वाहनांचे वाटप करणेत येत आहे.

१०) वाहन विमा –

महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्रमांक एम.व्ही.आर./१५९३/३२२/परिवहन – मंत्रालय, मुंबई ३१ दिनांक २६ मे १९९३ अन्वये म.न.पा. कडील वाहनांचा विमा उतरविणे पासून सुट मिळणेत आलेली आहे. या परिपत्रकामधील अधिनियम १९८८ चे कलम १४६/३ नुसार विमा बाबत तरतूद करणेत आलेली आहे व त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

११) जुनी वाहने व भंगार साहित्याचे लिलावाबाबत –

महानगरपालिकेच्या वापरात असलेली जुनी वाहने शासन निर्णयानुसार आयुर्मान पुर्ण झालेली वाहने आणि वाहनांच्या दुरुस्तीच्यावेळी निघालेले जुने स्पेअरपार्टस रितसर मान्यता घेऊन शासकीय लिलावदार निश्चित करून त्यांचे मार्फत लिलावाव्दार विक्री करणेत येते.

१२) म.न.पा. वाहनांचे आर.टी.ओ. पासिंग बाबत –

म.न.पा. चे वापरासाठी नविन वाहने खरेदी करणेत आल्यानंतर सदर वाहनांचे रिजस्ट्रेशन आर.टी.ओ. कार्यालयात करण्यात येते. व आवश्यकतेनुसार वाहनांचे आर.टी.ओ. पासिंग करण्यात येते.

१३)वाहने भाडेतत्वावर घेणे :- मनपास आवश्यक असल्यास विविद प्रकारची वाहने निविदा प्रसिद्द करून भाडेतत्वावर घेणेत येतात.